Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 224 – 227

DOI: 10.5281/zenodo.10115505

Original Research Article

# महात्मा गांधी : असहकार चळवळ

महाजन अनुराधा बस्वराज

संशोधक विद्यार्थिनी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: mahajananuradha424@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीजींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर 1920 पासून स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींकडे आले .भारतीय स्वातंत्र्यलढा हा त्यांच्या व्यक्तिमत्व व कार्याभोवती केंद्रित झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील गांधीजीं ही एकमेव व्यक्ती होय जिचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशातील जनतेपर्यंत जाऊन पोहोचले होते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेतेएक स्वातंत्र्ययोध्ये, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्योधारक, धर्मवक्तेआणिअर्थतज्ञ, होते. सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध दिलेला लढा हा मानव समाजाच्या इतिहासातील एक अपूर्व लढा आहे.

बाबा आमटे यांनी 'गांधीजी: युगमुद्रा' या लेखात म्हटले की,

"गांधीजींचे महात्मे सांगून गांधी सांगता येणार नाहीत; उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटण्यासाठी कदाचित कॉम्प्युटर लागेल पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही."

अल्बर्ट आईन्स्टाईन गांधीजी बद्दल म्हणतो,

"हाडामासाचा हा माणूस आमच्यात होता यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही".

### असहकार चळवळीची पार्श्वभूमी

जालियनवाला बाग हत्याकांड पंजाबातील सरकारची लष्करी दंडुकेशाही, तुर्कस्तान साम्राज्याचा विभाजनाचा धोका इ.स. 1919 च्या मॉन्टेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणा कायद्याच्या असमाधानकारक तरतुदी, देशातील आर्थिक महागाई आणि लोकांवरील ब्रिटिशांचा अन्याय अत्याचार या घटनामुळे देशातील वातावरण तप्त झाले होते अशा संतप्त वातावरणात इ.स. 1919 मध्ये काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन अमृतसर येथेच घेण्यात आले इ.स. 1919 च्या सुधारणा कायद्यात काही परिवर्तन करण्यासाठी संसदेने विचार करावा असा ठराव चित्तरंजन दास यांनी मांडला तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सरकारचे सहकार्य घ्यावयाचे की असहकार करावयाचे ते राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारी संघटना म्हणून काँग्रेसने ठरवावे असेही लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी स्पष्ट केले. मुसलमानाच्या समस्यांची दखल सरकारने घ्यावी यासाठी मोहम्मद अली जिना यांच्या नेतृत्वाखाली 19 जानेवारी 1920 रोजी एक शिष्टमंडळ वाईसरायला भेटले परंतु त्याचा उपयोग झाला नाही त्यामुळे 20 फेब्रुवारी 1920 रोजी कलकत्ता या ठिकाणी भरलेल्या खिलाफत सभेने ब्रिटिशाविरुद्ध असहकाराचा ठराव पास केला. 15 मे 1920 रोजी ब्रिटन ने तुर्कस्तानची सेव्हयर्सचा करार करून जाचक अटी लादल्या त्यामुळे मुंबई या ठिकाणी केंद्रीय खिलाफत समितीने सरकारची अहिंसा मार्गाने असहकाराचे आंदोलन करण्याचा निर्णय 28 मे 1920 रोजी घेतला यावेळी /महात्मा गांधींनी सुद्धा असहकार आंदोलन उचलून धरण्याचे घोषित केले हिंदू-मुस्लिम ऐक्यसदृढ करून स्वातंत्र्याच्या लढ्यात मुस्लिमांना सहभागी करून घेण्यासाठी महात्मा गांधींनी खिलाफतीचा प्रश्न उचलून धरला हिंदू मुस्लिम ऐक्याची संधी साधून त्यांनी सरकारशी असहकार आंदोलन पुकारले. (1)

### असहकार चळवळीची व्याख्या/अर्थ

असहकार या शब्दाचा अर्थएका वाक्यात सांगायचा झाला तर तो म्हणजे “कोणत्याही प्रकारचे सहकार्य न करणेहोय. “1920 मध्ये काँग्रेसने अन्यायी सरकार बरोबर असहकार करण्याचा ठराव संमत केला त्यानुसार सरकारी पदव्यांचा त्याग करणे, कायदेमंडळ, न्यायालय, शिक्षण संस्था, परकीय माल, इत्यादीवर बहिष्काटाकणे त्याचबरोबर शिस्त राखणे, राष्ट्रीय शिक्षण संस्थांना संरक्षणदेणे, आपापसातील भांडणे पंचाद्वारा सोडवणे, खादीचा वापरकरणे, तसेच त्यागाची भावना ठेवणे याही गोष्टी होत्या. 1921 मध्ये असहकार चळवळी जवळ-जवळ 30,000 लोक तुरुंगात गेले.(2)

**महत्त्वपूर्ण शब्द:** स्वदेशी, स्वराज, बहिष्कार, राष्ट्रीयशिक्षण, सत्य, अहिंसा, असहकार, चळवळ, सविनय, उपोषण,

### उद्दिष्टे

१. महात्मा गांधी असहकार चळवळ अभ्यासणे
२. असहकार चळवळ पार्श्वभूमी, उदय ,वाटचाल, यांचा आढावा घेणे
३. असहकार चळवळीच्या सकारात्मक कार्यक्रमावरती प्रकाश टाकणे
४. महात्मा गांधी यांच्या असहकार चळवळीचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय घटकांवर पडलेला प्रभाव अभ्यासणे
५. असहकार चळवळीचे यश-अपयश यावरती चर्चा करणे.

**असहकार चळवळीचा कार्यक्रम**

4 सप्टेंबर 1920 रोजीकलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या विशेष अधिवेशनात असहकार चळवळीच्या कार्यक्रमावर शिकामोर्तब करण्यात आले.

१. स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
२. हिंदू मुस्लिम ऐक्य
३. अस्पृश्यता निवारण
४. स्थानिक पातळीवर लवाद मंडळी स्थापन करून त्यांच्यामार्फत लहानसहान वादग्रस्त मुद्द्यांचा निकाल लावणे.
५. स्वदेशी उद्योगास प्रोत्साहन विशेषतः हातमाग व्यवसायाचे पुनरुजीवन करणे.
६. दारूबंदीचा प्रसार करणे
७. लोकमान्य टिळकांच्या स्मरणात एक कोटी रुपयांचा निधी जमा करणे.
८. राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करणे.
९. खादीचा प्रसार करणे.(3)

**असहकारचळवळ अपयश**

१. महात्मा गांधींनी असहकार चळवळ ऐनवेळी तहकूब केली चळवळ आणखीन काही दिवस चालली असती तर ती काही अशी यशस्वी झाली असती.ब्रिटिश सरकारचे दडपण वाढले असते.
२. ब्रिटिशांनी पाशवी बळाचा शस्त्रास्त्रांचा वापर करूनही चळवळ दडपून टाकली.
३. असहकार चळवळी बाबत काँग्रेसचे ज्येष्ठ नेत्यांत प्रारंभीपासूनच मतभेदहोते.बॅरिस्टर जिना, श्रीमती अँनी बेझंट, बिपिनचंद्र पाल, यांचा या आंदोलनास विरोध होता तसेच त्यांनी याच मुद्द्यावर काँग्रेसचे त्यागपत्र दिले होते.
४. काँग्रेसमध्ये जे नेते कार्यकर्ते होते त्या सर्वांचा पाठिंबा या चळवळीस नव्हता. गांधीजींच्या वैयक्तिक प्रभावामुळे त्यांनी या चळवळीस मान्यता दिली होती.
५. कोणतीही पूर्वतयारी न करता आणि जनतेला कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न देता सुरू केलेली ही चळवळ म्हणजे, माझी 'हिमालयाएवढी चूक' होती. असे खुद्द महात्मा गांधीजींनी मान्य केले. आंदोलन सुरू करण्यापूर्वी गांधीजींनी एका वर्षात स्वराज्य असे आश्वासन दिले होते.खुद्द सुभाषचंद्र बोस यांनी या आश्वासनावर प्रतिक्रिया देताना म्हटले, "एका वर्षात स्वराज्य प्राप्त करून देण्याचे आश्वासन केवळ अविवेकपूर्णच नव्हते तर लहान मुलांच्या बोलण्यासारखे होते."
६. असहकार चळवळीच्या कार्यक्रमानुसार कायदेमंडळाच्या निवडणुकावर बहिष्कार टाकला गेला, काँग्रेस पुरताच हा बहिष्कार सिमित होता काँग्रेस शिवाय इतर पक्षांनी कायदेमंडळाच्या निवडणुका लढवून कायदेमंडळात प्रवेशीही केला होता (4)

**सारांश**

महात्मा गांधींनी गव्हर्नर जनरल ला पत्र लिहून 1 फेब्रुवारी 1922 रोजी बारडोली व गुंतुर या ठिकाणी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करत असल्याचे कळविले होते परंतु सरकारकडे केलेल्या मागण्यांची सात दिवसांची मुदत

संपण्यापूर्वी अहिंसात्मक मार्गाने चालणाऱ्या असहकार चळवळीस हिंसक वळण लागले उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे 5 फेब्रुवारी 1922 रोजी 3,000 च्या एका जमावाने दंगलीस प्रारंभ केला त्यामध्ये 20 पोलीस व एक सबइनस्पेक्टर यांना ठार करण्यात आले या हिंसक घटनेची बातमी गांधींना समजल्यानंतर त्यांना अती दुःख झाले 12 फेब्रुवारी 1922 रोजी बारडोलीच्या सत्याग्रहाची रुपरेषा निश्चित करण्यासाठी बोलावलेल्या संमेलनात महात्मा गांधींनी असहकार चळवळ बंद करण्याचा प्रस्ताव मांडला आणि तो बहुमताने पास करण्यात आला अशा रीतीने असहकार चळवळ बंद केल्याचे महात्मा गांधींनी घोषणा केली.

**संदर्भ सूची**

१. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास इ.स.1818 ते 1960 डॉ. अनिल कठारे, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद पृष्ठ क्रमांक 385, 386

२. आधुनिक भारताचा इतिहास (1707 पासून आधुनिक कालखंडापर्यंत ) डॉ. बी. एल.ग्रोवर डॉ. एन. के. बेल्हेकर, एस.चंद आणि कंपनी रामनगर, नवी दिल्ली 110055

३. आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात प्राचार्य डॉ.एस.एस. गाठाळ, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. महात्मा गांधींचे विचार संकलन आणि संपादन आर. के. प्रभू आणि यु. आर.राव, अनुवाद ब्रिजमोहन हेडा,नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद– 380 014